**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे**

**दूरशिक्षण विभाग**

---

**जा.क्र.**१४/२०४२ **दि.**२४/१२/२०१४

**प्रिय विद्यार्थी मित्रांनो,**

नूतन वर्षाच्या आपणांस हार्दिक शुभेच्छा!

वृत्तपत्र विद्या पदवी ( बी.जे.) ,वृत्तपत्र विद्या पारंगत ( एम्.जे.भाग -१) या अभ्यासक्रमासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक परीक्षेचा एक भाग म्हणून अंतर्गत मूल्यमापन/कार्यानुभव हा दोनशे गुणांसाठी विषय आहे. त्यात तुम्हांला शोधनिबंध हा विषय असून त्यास १२० गुण लेखी प्रकल्पासाठी
व ८० गुण तोंडी परीक्षा याप्रमाणे मूल्यमापन केले जाते.

शोधनिबंधासाठी या वर्षीचे विषय -

**१)आव्हान दुष्काळाचे**

**२) प्रादेशिक पक्षांचे आस्तित्व संपुष्टात येत आहे का**

यापैकी एक विषय निवडून २५ ते ३० पानांचा शोधनिबंध सादर करावयाचा आहे. शोधनिबंधात काही आकडेवारी,तक्ते,आलेख,मुलाखती,प्रश्नावली,छायाचित्रे,यांचाही समावेश करावा. विद्यार्थ्यांनी शोधनिबंध हस्ताक्षरात किंवा डी.टी.पी.करून दि.१५ मार्च २०१५ पूर्वी विद्यापीठाकडे सादर करावा.

**१) आव्हान दुष्काळाचे** - यावर्षी देण्यात आलेले दोन्ही विषय महत्वाचे आहेत. दरवर्षी राज्याला दुष्काळाच्या आव्हानाला सामोरे जावे लागते. दुष्काळाची कारणे माहित असुनही कायम स्वरूपी तोडगा काढण्याऐवजी दुष्काळग्रस्तांना मदत,आर्थिक पॅकेज,वीजबीलात सवलत आदी उपाय योजले जातात. ही दुष्कळावरची तात्पुरती मलमपट्टी ठरते. विरोधकांकडून सरकारला या प्रश्नावर अडचणीत आणण्याचा प्रयत्न होतो. दुष्काळ कायम स्वरूपी हटविण्यासाठी काय करता येईल,त्यावरचे राजकारण कसे थांबवता येईल या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी आपली मते,निष्कर्ष नोंदवावेत. यासाठी काही मुलाखती,वृत्तपत्रातील माहितीचा आधार,इंटरनेटवरून मिळालेले काही संदर्भ मांडून तक्ते, नकाशे वापरून शोधनिबंध लिहावयाचा आहे.

२) **प्रादेशिक पक्षाचे आस्तित्व संपुष्टात येत आहे का** - मोदी लाटेने अनेक राज्यात प्रादेशिक पक्ष कमकुवत झाल्याचे चित्र पुढे आले आहे. केवळ व्दिपक्षीय राज्यपद्धती लोकशाहीसाठी उपयुक्त ठरेल का अशी चर्चा होत आहे. प्रादेशिक पक्ष कमकुवत का झाले,आयाराम गयाराम प्रवृत्ती, स्वार्थासाठी मोठ्या पक्षांशी तडजोडी यामुळे प्रादेशिक पक्षांची विश्वासार्हता संपली आहे का? यापुढील काळात प्रादेशिक पक्षांचे महत्व अबाधित राहील का याविषयी तुम्ही शोधनिबंधात तुमची मते,निष्कर्ष मांडायचे आहेत. या दोन्ही विषयांची हाताळणी करताना विविध लोकसमुहाशी चर्चा करून,प्रश्नावलीची उत्तरे घेउन,काही आकडेवारी,तक्ते (ग्राफीक्स ) यांचा वापर करून तुम्ही शोधनिबंध सादर करावयाचा आहे.

**शोधनिबंधाची फाइल १५ मार्च २०१५ पूर्वी विद्यापीठात जमा होणे आवश्यक आहे.**

**वृत्तपत्र विद्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या ( सी.जे.) विद्यार्थ्यांसाठी-**

१) विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रश्नपेढीतील प्रत्येक विषयाचे किमान १० याप्रमाणे एकूण ३० प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहावयाची आहेत.

२) या विद्यार्थ्यांसाठी कात्रणसंग्रह हा विषय आहे. त्यासाठी पुढील दोन विषय आहेत

**अ) मराठवाड्यातील दुष्काळ**

ब) **यंदाचे मराठी साहित्य संमेलन**

त्या अनुषंगाने विविध वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेल्या बातम्या,लेख,अग्रलेख असा मजकूर प्रसिद्ध होत आहे. ही सर्व कात्रणे एकत्रित करून विद्यार्थ्यांनी कात्रण संग्रह तयार करावयाचा आहे. या कात्रणाच्या आधारे सुमारे तीनशे शब्दांचे टिपणही विद्यार्थ्यांनी लिहायचे आहे.

**रामदास नेहुलकर**
**समन्वयक वृत्तपत्रविद्या अभ्यासक्रम**



------------------